महाराष्ट्र शासन

# अधिष्ठाता यांचे कार्यालय, शासकीय आयुर्वेद महाविद्यालय,जळगांव

श्री.गुलाबराव देवकर अभियांत्रिकी महाविद्यालय,परिसर,शिरसोली रोड,जळगांव-४२५००२

Office of the Dean,Govt.Ayurved College,Jalgaon.

Shri.Gulabrao Deokar Enginieering Campus, Shirsoli Road, Jalgaon-425002

Email :- gacjalgaon@gmail.com

---

जा.क्र.शाआमज/भांडार/COVID 19 खरेदी/ 1313 /२०२१ दिनांक- 14 AUG 2021

## दरपत्रक सुचना

प्रति,

..............................

--------------------

--------------------

विषय - यंत्रसामुग्री/साधनसामुग्री/उपकरणे/साहित्य/वस्तु इ. खरेदीकरिता दरपत्रके सादर करणेबाबत.

मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन समिती, जळगांव यांचेकडून कोवीड-१९ अंतर्गत राज्य आपत्ती प्रतिसाद निधीमधुन (SDRF) प्राप्त झालेल्या अनुदानातुन या महाविद्यालय व संलग्नित रुग्णालयाकरिता सोबतच्या यादीतील नमुद तपशिलानुसार यंत्रसामुग्री/साधनसामुग्री/उपकरणे/साहित्य/वस्तु इ खरेदीसाठी विहित वेळापत्रकानुसार संबधित पुरवठादाकडुन दरपत्रके मागविण्यात येतआहे.

तरी इच्छुक व पात्र पुरवठादारांनी त्यांची कमीत कमी दरांची दरपत्रके सिलबंद पाकिटामध्ये अधिष्ठाता, शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, जळगांव यांचे कार्यालयात पोस्टाने अथवा समक्ष खालील नमूद अटी व शर्तीच्या अधिन राहून सादर करण्यात यावीत.

| क्र. | बाब | कालावधी |
|---|---|---|
| 1 | दरपत्रके सादर करण्याचा कालावधी | **दि१७.०८.२०२१** ते **दि २७.०८.२०२१** सुटीचे दिवस वगळुन कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत. |
| 2 | दरपत्रके उघडण्याचा दिनांक व वेळ | **दि ३०.०८.२०२१** रोजी दुपारी २.०० वा. |
| 3 | दरपत्रके उघडण्याचे ठिकाण | अधिष्ठाता, शासकीय आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालय, द्वारा श्री. गुलाबराव देवकर अभियांत्रिकी महाविद्यालय परिसर, सिरसोली रोड, जळगांव. ४२५००२. |

## अटी व शर्ती

१ दिनांक २७.०८.२०२१ रोजी सायंकाळी ५.०० वाजल्यानंतर प्राप्त होणा-या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.

२ दरपत्रकाच्या पाकीटावर **यंत्रसामुग्री/ साधनसामग्री/उपकरणे/वस्तु इ. (कोवीड १९) खरेदी करिता दरपत्रक सादर करणेबाबत** असा स्पष्ट उल्लेख करणे आवश्यक आहे.

३ दरपत्रकावर कोणत्याही प्रकारची खाडाखोड किंवा अेव्हररायटींग असता कामा नये.

४ पुरवठादाराने सदर खरेदी संदर्भातील आवश्यक माहिती सोबतच्या प्रपत्रात (Annexure B) मध्ये सादर करावी.

५ पुरवठादाराने GST ची नोंदणी करणे आवश्यक आहे. तसेच दरपत्रके संस्थेच्या नोंदणी क्रमांक असलेल्या लेटर हेडवर विहित नमुन्यात सादर करणे आवश्यक राहील.

६ दरपत्रक ससादर करणा-या दरपत्रक धारकांचा किंवा संस्थेचा दरपत्रक प्रक्रियेत भाग घेणा-या अन्य संस्थेमध्ये थेट स्वारस्य असु नये, तसे आढळल्यास दोन्ही किंवा अधिक दरपत्रके नाकारण्यात येतील. यासोबत जोडण्यात आलेली हमीपत्र दरपत्रकधारकास सादर करणे बंधनकारक राहील. **(सोबत जोडलेले विहित नमुन्यातील हमीपत्र (१) सादर करावे.)**

७ दरपत्रक धारकांनी केवळ एकच दरपत्रक सादर करावे. दरपत्रक सादर केलेल्या दरपत्रक धारकाचा दरपत्रक प्रक्रियेत भाग घेतलेल्या इतर संस्थासोबत प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष संबंध वा सहभाग नसावा. तसे आढळल्यास दरपत्रक नाकारण्यात येतील.**(सोबत जोडलेले विहित नमुन्यातील हमीपत्र (२) सादर करावे.)**

८ दरपत्रकासोबत GST, PAN Card, Shop Act Licence, Renewal etc प्रमाणपत्रे सादर करणे आवश्यक राहील.

९ देयकाच्या रकमेतुन शासन नियमातील तरतुदीनुसार GST/Income Tax कपात करण्यात येईल. पुरवठयाच्या बाबी जीएसटी मधुन वगळलेल्या असतील तर त्या पृष्ठ्यर्थ संबंधित नियमांच्या प्रती जोडणे आवश्यक राहील.

१० दरपत्रकानुसार मंजुर करण्यात आलेल्या दराव्यतिरिक्त इतर कोणतेही दर देय होणार नाहीत.

११ या महाविद्यालयाने दरपत्रक सुचनेमध्ये नमुद केलेल्या स्पेसिफिकेशननुसार संबंधित यंत्रसामुग्री/ साधनसामग्री/उपकरणे/वस्तु इ. चा पुरवठा करणे आवश्यक राहील. स्पेसिफिकेशननुसार नसलेल्या वस्तुंचा स्विकार केला जाणार नाही.

१२ खरेदी करावयाची यंत्रसामुग्री/ साधनसामग्री/उपकरणे/वस्तु इ. हमी कालावधी (Warranty Period) मध्ये असल्यास त्यानुसार वेळावेळी सेवा देणे आवश्यक राहील.

१३ दरपत्रकासोबत ज्या यंत्रसामुग्रीकरिता दरपत्रक सादर करण्यात येत आहे त्या यंत्रसामुग्रीची विस्तुत माहिती असलेले माहिती पत्रक (Product Catalogue) जोडावे.

१४ पुरवठा करण्यात येणारी सर्व यंत्रसामुग्री/ साधनसामग्री/उपकरणे/वस्तु इ. संस्थेस पोहोच करण्याची तसेच आवश्यकतेनुसार सदर यंत्रसामुग्री/ साधनसामग्री/उपकरणे/वस्तु इ इन्स्टॉलेशन करण्याची जबाबदारी पुरवठादाराची राहील. त्यासाठी कोणतेही अतिरिकक्त शुल्क अदा केले जाणार नाही. तसेच पुरवठा केलेल्या यंत्रसामुग्री/ साधनसामग्री/उपकरणे/वस्तु इ. मध्ये कोणत्याही प्रकारची तुटफुट/नुकसान/गहाळ झाले असल्यास सदर यंत्रसामुग्री/ साधनसामग्री/उपकरणे/वस्तु इ. चा स्विकार केला जाणार नाही.

१५ यशस्वी दरपत्रकाधारकास पुरवठा आदेश निर्गमित झाल्यानंतर ३० दिवसांच्या आत सदर यंत्रसामुग्री/ साधनसामग्री/उपकरणे/वस्तु इ. पुरवठा करणे आवश्यक राहील. सदर दिवसांच्या आत सदर यंत्रसामुग्री/ साधनसामग्री/उपकरणे/वस्तु इ. प्राप्त न झाल्यास सदरचे पुरवठा आदेश आपोआप रददबातल ठरतील. तसेच सदर सदर यंत्रसामुग्री/ साधनसामग्री/उपकरणे/वस्तु इ. चा पुरवठा केल्यानंतर ३० दिवसांचे आत त्यामध्ये काही त्रुटी/खराब झाल्याचे निदर्शनास आल्यास सदर यंत्रसामुग्री/ साधनसामग्री/उपकरणे/वस्तु इ. स्वखर्चाने परत नेऊन त्याऐवजी नवीन यंत्रसामुग्री/ साधनसामग्री/उपकरणे/वस्तु इ. चा पुरवठा या महाविद्यालयास (३०) दिवसांचे आत करावा लागेल.

१६ पुरवठादाराने पुरवठा आदेशानुसार यंत्रसामुग्री/ साधनसामग्री/उपकरणे/वस्तु इ. चा पुरवठा न केल्यास एल - २ क्रमांकाच्या दरपत्रक धारकाकडून सदर यंत्रसामुग्री/ साधनसामग्री/उपकरणे/वस्तु इ. ची खरेदी करण्यात येईल.

१७ ज्या यंत्रसामुग्रीकरिता दरपत्रक सादर करण्यात येत आहे ते I.S.I (आय.एस.आय.) चिन्हांकित असेल तर ठळकपणे नमुद करावे.

१८ यशस्वी दरपत्रक धारकास त्याच्या देयकाची रक्कम ऑनलाईन पध्दतीने त्यांचे बँक खात्यात जमा करावयाची झाल्यास विहित नमुन्यातील राष्ट्रीयकृत बँक खाते प्रमाणीकरण प्रपत्र, पॅनकार्ड झेरॉक्स प्रत व रदद केलेला धनादेश इ. महाविद्यालयास देणे आवश्यक राहील. त्याशिवाय देयकाची रक्कम अदा करणे शक्य होणार नाही.

१९ दरपत्रक सादर करतेवेळी यंत्रसामुग्री पुरवठा करणेसाठी काही अतिरिक्त शुल्क/दर असल्यास ते देखील स्वतंत्रपणे नमुद करावेत.

२० दरपत्रक उघडल्यानंतर पुरवठादाराने सादर केलेल्या यंत्राच्या विर्निदिष्टानुसार ( Specification) सदर यंत्राची प्रत्यक्ष पडताळणी व आवश्यकता वाटल्यास तशी चाचणी महाविद्यालयातील संबंधित तज्ञा मार्फत करण्यात येईल. त्याकरिता आपण आवश्यक ती व्यवस्था करुन ठेवावी.

२१ शासन निर्णय उद्योग व उर्जा विभाग दि. ०१.१२.२०१६ मध्ये नमुद केल्यानुसार खेरदीच्या कोणत्याही टप्यावर अनियमितता/गैरप्रकार/नैतिक अध:पतन इतरही बाबी निदर्शनास आल्यास त्याबाबत शासन निर्णयामध्ये नमूद केल्यानुसार कार्यवाही करण्यात येईल

२२ पुरवठा करण्यात आलेली वस्तु स्पेसिफिकेशननुसार असुनही कमी दर्जाची असल्याचे आढळुन आल्यास सदर पुरवठा आदेश रदद करण्याचे अधिकार अधिष्ठाता, शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, जळगांव यांना राहतील.

२३ दरपत्रक स्विकारणे, रदद करणे, यशस्वी दरपत्रक स्विकारण्या पुर्वी किंवा यशस्वी दरपत्रक स्विकारण्यात आल्यानंतर देखील कोणत्याही वेळी, कोणत्याही टप्यावर खरेदी प्रक्रिया रदद करण्याचे अधिकार तसेच खरेदी प्रक्रियेच्या अटी व शर्तीमध्ये कोणताही बदल करण्याचे अधिकार अधिष्ठाता, शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, जळगांव यांना राहतील.

(वैद्य मिलींद भा. निकुंभ)
अधिष्ठाता
शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, जळगांव.

उपरोक्त दरपत्रकाची सुचना www.gacjalgaon.in व www.mahayush.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

**दरपत्रकासोबत खालील कागदपत्रे जोडण्यात यावीत.**

१ विहित नमुन्यातील स्वाक्षरीत हमीपत्र

२ आधारकार्ड झेरॉक्स स्वसाक्षांकित प्रत

३ पॅनकार्ड झेरॉक्स स्वसाक्षांकित प्रत

४ शॉपॲक्ट प्रमाणपत्र झेरॉक्स स्वसाक्षांकित प्रत

५ GST प्रमाणपत्र झेरॉक्स स्वसाक्षांकित प्रत

६ व्यवसाय नोंदणी प्रमाणपत्र स्वसाक्षांकित प्रत

७ संस्थेच्या रदद केलेल्या धनादेशाची प्रत.

महाराष्ट्र शासन
अधिष्ठाता यांचे कार्यालय, शासकीय आयुर्वेद महाविद्यालय,जळगांव
श्री.गुलाबराव देवकर अभियांत्रिकी महाविद्यालय,परिसर,शिरसोली रोड,जळगांव-४२५००२
Office of the Dean,Govt.Ayurved College,Jalgaon.
Shri.Gulabrao Deokar Enginieering Campus, Shirsoli Road, Jalgaon-425002
Email :- gacjalgaon@gmail.com

## यंत्रसामुग्री/ साधनसामग्री/उपकरणे/वस्तु इ.ची यादी

| क्र. | यंत्रसामुग्री/ साधनसामग्री /उपकरणे /वस्तुचेनांव | स्पेसिफिकेशन्स | नग संख्या |
|---|---|---|---|
| 1 | Semi fowler Beds with Matress | Size/ Dimension – 72 x 36 x 20<br>Frame Material – Standarad Steel<br>Foldable- Yes<br>Adjustable Backrest<br>Finish- Powder Coated<br>With Urine Hook<br>Elevation - Head Side<br>S.S. Bow Handle<br>Matress- 4' Memory foam | 50 |
| 2 | fowler Beds with Matress | Size/ Dimension – 72 x 36 x 20<br>Frame Material – Standarad Steel<br>Foldable- Yes<br>Adjustable Backrest<br>Finish- Powder Coated<br>With Urine Hook<br>Elevation - Head Side<br>S.S. Bow Handle<br>Matress- 4' Memory foam | 50 |
| 3 | Multipara Monitor | 12" 8 parameters NIBP, ELG, RESP, TEMP, SPO2, PR, HR, ETCO2 | 05 |
| 4 | 125 kVA Diesel Generator, Voltage: 440 V | P) DIESEL ENGINE:- four cylinders, **water cooled**, naturally aspirated, and developing 156 hp @ 1500 RPM. Vertical diesel engines , electric start, compression ignition, 4 stroke, 1500 RPM confirming to IS 10002, ISO-3046, BS 5514 standard with an overload capacity of 10 % for one hour in every 12 hrs. operation.<br>• Integrated cooling system(blower)<br>• Mico fuel pump with Mechanical Governor<br>• Dry type air cleaner<br>• Exhaust Silencer<br>• Lub Oil filter (Spin OnType)<br>• Fuel Oil filter (Spin OnType)<br>• 12V Electric startingsystem<br>• Battery charging alternator<br>• Stop solenoid<br>• Lub Oil pressure gauge<br>• Cylinder head temp.Gauge<br>• Ammeter batterycharging<br>• First Fill of Lubeoil | 01 |

| | | | |
|---|---|---|---|
| | | Q) ALTERNATOR:-<br>1500 rpm **440V**, 0.8 PF, 50Hz, **3 Phase**. 4 Wires, , self- excited & self- regulated, with Brush less, Excitation Band of voltage regulation +- 1% of rated voltage, from no load to full load, Insulation class H, The alternator conforms to BS 2613/IS 4722<br>R) BASE FRAME:-<br>Suitable to couple above Engine & Alternator made from steel sheet metal.<br>S) FUEL TANK: -<br>8 Hrs Capacity, with Inlet & Outlet arrangement, air vent & drain plug arrangement.<br>T) BATTERIES:-<br>1 No.12 V battery with Leads and Battery Cable. | |
| 5 | De Fibrilator | Type of external transcutaneous pacing modes- Both Demand mode and fixed mode , Ability to display CPR index on screen real time- Yes, Patient compatibility to defibrillate- Adult ,pediatric patients, Type of display- LCD, Provision of printing ECG trace & stored information - Yes, Modes in defibrillator - Automated external defibrillation and manual, ECG monitoring- Using 3 lead, Confirmity to Manufactures Certification- ISO 9001 & ISO 13485, Facility to have synchronized cardio version- Yes | 01 |

(वैद्य मिलींद भा. निकुंभ)
अधिष्ठाता
शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, जळगांव.

Annexure - B

कंपनीच्या लेटरहेडवर खालील नमूद तपशिलाप्रमाणे माहिती भरणे

प्रति,
अधिष्ठाता,
शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, जळगांव.

**यंत्रसामुग्री/उपकरणे इ. पुरवठा करणेकरिता दरपत्रक**

| अ.क्र. | तपशिल | आवश्यक माहिती वा प्रमाणपत्रे जोडण्यात आलेली आहेत किंवा कसे |
|---|---|---|
| १ | पुरवठादाराचे नाव | |
| २ | कंपनीचा पत्ता,दुरध्ववी ई-मेल आयडीसहित | |
| ३ | कंपनीचा नोंदणी क्रमांक ( Registration No.) | |
| ४ | GST No. | |
| ५ | PAN No. | |
| ६ | उत्पादक असल्यास तसे नमूद करावे अथवा प्राधिकृत पुरवठादार असल्याबाबतचे उत्पादक कंपनीचे पत्र | |
| ७ | सदर यंत्राचा इतर शासकीय / निमशासकीय कार्यालयास पुरवठा केला असल्यास अशा कार्यालयाचे पत्ते व दुरध्वनी क्र. अथवा पुरवठा आदेशांची छायांकित प्रत | |
| ८ | हमी कालावधी ( Warranty Period ) | |
| ९ | यंत्राची माहिती पुस्तिका/पत्रक जोडले आहे किंवा नाही | |
| १० | हमी पत्र जोडले आहे किंवा नाही | |
| ११ | इतर अटी व शर्ती असल्यास | |

स्थळ :
दिनांक :पुरवठादाराचा अधिकृत स्वाक्षरी व शिक्कांसहित

हमीपत्र -१ ( Undertaking )

प्रति,
अधिष्ठाता,
शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, जळगांव.

मी M/s. ..........................................................................................

पत्ता :- ..........................................................................................................

लेखी हमी देत आहे की, आपल्या कार्यालयामार्फत ..................................................खरेदी करणेसाठी राबविण्यात येत असलेल्या दरपत्रक प्रक्रियेत मी भाग घेत असून माझे किंवा माझ्या संस्थेचे खरेदी प्राधिकारी/खरेदी समिती वा कार्यालयाशी कोणत्याही प्रकारचे हितसंबध/संघर्ष नाहीत तसे आढळून आल्यास माझे दरपत्रक नाकारण्यात यावे वा अपात्र समजण्यात यावे.

स्थळ :-

दिनांक :-

पुरवठादारांच्या अधिकृत स्वाक्षरी व शिक्कासह

हमीपत्र-२ ( Undertaking )

प्रति,
अधिष्ठाता,
शासकीय आयुर्वेदमहाविद्यालय, जळगांव.

मी M/s. ........................................................................................................

पत्ता :- ................................................................................................................ लेखी हमी देत आहे की, आपल्या कार्यालयामार्फत ................................................................. खरेदी करणेसाठी राबविण्यात येत असलेल्या दरपत्रक प्रक्रियेत मी/माझी संस्था केवळ एकच दरपत्रक सादर करीत आहे. त्याचप्रमाणे दरपत्रक प्रक्रियेत भाग घेण्या-या अन्य संस्थांसोबत माझा/माझ्या संस्थेचा कोणत्याही प्रकारचा प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष संबध वा सहभाग नाही तसे आढळून आल्यास माझे दरपत्रक नाकारण्यात यावे वा अपात्र समजण्यात यावे.

स्थळ :-
दिनांक :-

पुरवठादारांच्या अधिकृत स्वाक्षरी व शिक्कासह